दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## क्रीडा शिक्षकांना शालेय क्रीडा स्पर्धेचे ऑनलाईन फॉर्म भरण्याचे प्रशिक्षण

**ठाणे**(10): शालेय क्रीडा स्पर्धेच्यावेळी क्रीडा शिक्षकांची धावपळ होऊ नये तसेच स्पर्धा नोंदणी प्रक्रिया जलदगतीने पूर्ण व्हावी याकरिता ठाणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्यावतीने शहरातील सर्व शालेय क्रीडा शिक्षकांना ऑनलाईन फॉर्म भरण्याचे प्रशिक्षण आज देण्यात आले.या प्रशिक्षण वर्गाचे उदघाटन क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती दीपक वेतकर यांच्या हस्ते व उप आयुक्त संदीप माळवी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी उप खातेप्रमुख दिलीप पाटील, रिमा देवरुखकर,विक्रांत म्हात्रे, शालेय क्रीडा स्पर्धा समितीचे शंकर बरकडे, अशोक आहेर, सतीश जाधव, जुबेर बक्षी, श्रीमती वैजयंती तात्रे, रोहिणी कोळी आदी उपस्थित होते.

क्रीडा विभागाच्यावतीने सन २०१९-२० या वर्षात ६ वी ते १२ वी या वर्गातील १४, १७ व १९ वर्षाखालील गटात विविध खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या क्रीडा स्पर्धेत महापालिका क्षेत्रातील २५० ते ३०० शाळा सहभागी होतात. या स्पर्धेकरिता सहभागी विद्यार्थ्यांचे प्रवेश फॉर्म ऑनलाईन भरण्यात येणार असून या स्पर्धेचे ऑनलाईन फॉर्म कसे भरले जावे, कोणती प्राथमिक माहिती भरणे अनिवार्य आहे याचे प्रशिक्षण आज क्रीडा विभागाच्यावतीने सर्व क्रीडा शिक्षकांना देण्यात आले. ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेमुळे क्रीडा शिक्षकांचा वेळ वाचणार असून नोंदणी प्रक्रिया जलदगतीने पूर्ण होणार आहे.